: प्रकरण ३ रे :

# कम्युनिस्ट पक्षाचे सामाजिक व राजकीय कार्य

: प्रकरण तिसरे :

# "कम्युनिस्ट पक्षाचे सामाजिक व राजकीय क्षेत्रातील कार्य"

"राजकीय पक्ष राजकीयदृष्ट्या लोकांना जागृत करत असतो आणि राजकीय प्रश्नासंबंधी लोकांमध्ये अभिरूची निर्माण करतो. शासक व शाशीत ह्यातील संवाद घडविण्याचे कार्य राजकीय पक्षाचे आहे."[1] शासन आणि जनता यांचा महत्त्वाचा दुवा म्हणून प्रत्येक राजकीय पक्षाला कार्य करावे लागते. जनतेच्या मागण्यांचा पाठपुरावा करावा लागतो.

प्रत्येक राजकीय पक्षाची कार्य करण्याची पद्धती वेगवेगळ्या स्वरुपाची असेल पण वरील बाबींची आवश्यकता प्रत्येक राजकीय पक्षाला असते. आणि त्या अनुषंगाने प्रत्येक राजकीय पक्षाला सामाजिक व राजकीय कार्ये करावी लागतात.

इचलकरंजीमध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष व भारतीय कम्युनिस्ट पक्ष कार्य करतो. हे दोन्ही वर्ग एकाच वर्गासाठी कार्य करतात. समाजवाद प्रस्थापित करून कामगार राज्य निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. या दोहोंची कार्य करण्याची पद्धती वेगळी आहे. म्हणून प्रत्येक राजकीय पक्षांचा राजकीय प्रवास हा त्याचा पक्ष घटनेनुसार, ध्येयधोरणानुसार असतो.

## मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे सामाजिक क्षेत्रातील कार्य :-

समाजात विविध मताचे लोक असतात. त्यांचे दृष्टिकोण भिन्न असतात. कोणत्याही राजकीय पक्षांचा उद्‌देश लोक कल्याण साधणे हा असतो. लोकांचा विश्वास संपादन करून जास्तीत जास्त

समाजहित साधणे राजकीय पक्षांद्वारे शक्य होते. म्हणून समाजहित साध्य करावयाचे असेल तर प्रत्येक राजकीय पक्षाला सामाजिक कार्ये करावी लागतात.

इचलकरंजीमध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे पुढील सामाजिक कार्ये केली आहेत.

## 1) यंत्रमाग कामगारांचे प्रश्न :-

"मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षांने यंत्रमाग कामगारांचे अनेक प्रश्न सोडविले आहेत. सुरूवातीच्या काळात यंत्रमाग धंद्यातील कामगारांचे प्रश्न ट्रेड युनियनच्या माध्यमातून सोडविण्याचे प्रयत्न मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने केले आहेत.

इचलकरंजीतील यंत्रमाग कामगारांचा वेतनाचा प्रश्न ज्या वेळी निर्माण झाला त्यावेळी भांडवलदारांच्या, कारखानदारांच्या विरुद्ध लढा उभारून त्यांना वेतन मिळवून दिले. यंत्रमागावर येणारा कामगार असंघटित असतो. त्याला संघटित करून त्यांच्यामध्ये वर्गीय जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी माथाडी बोर्डाच्या धर्तीसारखा यंत्रमाग कामगारासाठी वेगळा कायदा करावा. म्हणजे यंत्रमागधारकाच्या व कामगारांच्या समस्या सुटतील. यंत्रमाग कामगाराला कोणत्याही स्वरूपाच्या सेवा सवलती, पेन्शन, प्रा. फंड नाहीत. यासाठी वेळोवेळी शासन दरबारी मागणी मांडली आहेत. अशा प्रकारे अनेक प्रकारे यंत्रमाग कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले आहेत. "[2]

## 2) बोनसच्या प्रश्नांवर संघर्ष :-

"इचलकरंजीतील यंत्रमागावर काम करणाऱ्या कामगाराला दिवाळीला बोनस मिळावा

यासाठी सातत्याने संघर्ष मा. क. प ने केला आहे. या व्यवसायामध्ये तीन स्वरुपाचे कामगार आहेत. खर्चिवाले कारखानदार, स्वत: पेढीवाले कारखानदार आणि मोठे कारखानदार. या तिघांच्या समस्या वेगवेगळ्या आहेत. म्हणून बोनसच्या प्रश्नांवर यांच्या भूमिका वेगळ्या आहेत. खर्चिवाल्या कामगारांची स्थिती नाजूक आहे. तरी सुद्धा इचलकरंजीतील यंत्रमाग कामगारांवर अन्याय होतो. वर्षभर तो काम करतो. आणि त्यांच्या मोबदल्यात दिवाळीला बोनस दिला नाही. तर यंत्रमाग कामगार दिवाळी साजरी करणार नाही. पण कारखानदारांची स्थिति याबरोबर उलटी आहे. म्हणून यंत्रमाग कामगाराना 10 ते 12% बोनस मिळावा म्हणून प्रत्येक वर्षी संघर्षाची भूमिका मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने घेतली आहे. "[3]

### 3) झोपडपट्टीबाबतचे कार्य :-

"इचलकरंजीमध्ये यंत्रमाग व्यवसाय वाढल्यामुळे शहराच्या अनेक समस्या निर्माण झाल्या. यंत्रमाग व्यवसायात काम करणारा वर्ग ग्रामीण भागातून आला आणि इचलकरंजीमध्ये कामगारासाठी कामगार कॉलनी निर्माण न केल्यामुळे झोपडपट्टीची समस्या निर्माण झाली. इचलकरंजी लालनगर झोपडपट्टी, जयभिम झोपडपट्टी, घिसाडगल्ली झोपडपट्टी अशा झोपडपट्टी तयार झाल्या. इचलकरंजी नगरपालिकेने योग्य पर्यायी जागा दिली नाही.

झोपडपट्टी पूनर्वसन व्हावे. पूनर्वसनवासियांना इचलकरंजी नागरपालिकेकडून अनुदान द्यावे. नियोजित जागी रस्ते, लाईट, पाणी या नागरीसुविधा पुरविण्यात याव्यात यासाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने आंदोलन करून त्यांचा प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न केला."[4]

## 4) महागाई बाबत पक्षाचे कार्य :-

"इचलकरंजीमध्ये यंत्रमागावर काम करणारा कामगार 12- 12 तास मागावर काम करतो आणि त्याला मोबदला कमी मिळतो. मिळणाऱ्या वेतनात त्याचा घरखर्च भागत नाही. जीवनावश्यक गरजा भागविण्या इतके त्याला वेतन मिळत नाही. भारतात महागाई सतत वाढत आहे. महागाई इचलकरंजीपूरती मर्यादीत नसली तरी त्याना मिळणारे वेतन आणि वाढते भाव यांची सांगड बसत नाही. म्हणून जीवनावश्यक वस्तूवरील महागाई कमी करावी यासाठी पक्ष संघटनेद्वारे राष्ट्रीय, राज्यपातळीपर्यंत सतत प्रयत्न केला जातो."[5]

"सरकारला महागाई रोखता येत नाही. त्यामुळे देशातील सर्वसामान्य लोकांचे जीवनमान निकृष्ट प्रतीचे बनत आहे. साहजिकच इचलकरंजीतील यंत्रमाग कामगार अधिक दुर्बल बनत आहे. महागाई ही शहरी भागापुरती नाही. ग्रामीण भागात शेतकरी, शेतमजूर यांच्यावरही महागाईचा परिणाम होत आहे."दोन वेळच्या जेवणांची भ्रांत असलेली दारिद्र्य रेषेखालची जनता आहे. सरकारच्यामते देशांत या जनतेचे प्रमाण अवघे 19% आहे. म्हणजे 18 कोटी लोकाची ही दैन्यावस्था आहे. खरे प्रमाण 40% म्हणजे 37% कोटीवर आहे. यामुळे दारिद्र्यरेषेखाली असलेले लोक महागाईच्या ओझ्याखाली दबत आहे." यासाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने मोर्चे काढून सरकारचा नाकर्तेपणा जनतेस दाखवून दिला आहे."[6]

## 5) शहराच्या आरोग्याबाबतचे पक्षाचे कार्य :-

"इचलकरंजी शहरात सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता असली पाहिजे. शहर सुंदर दिसले

पाहिजे. इचलकरंजीचे नगराध्यक्ष होते तेव्हा कै. कॉ. के. एल् . मलाबादे यांनी सार्वजनिक संडास व मुतारी बांधण्यास मंजूरी दिली. त्यामुळे बऱ्याच अंशी शहराच्या अरोग्याचा प्रश्न सुटण्यास मदत झाली. स्वच्छतागृहे नाहीत अशा ठिकाणी नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो.

यंत्रमागावर काम करणारा मजूर 12-12 तास पाळी करतो. कामगार नेहमी सुताच्या सानिध्यात असल्याने त्याला टी.बी. सारखे आजार होतात. यासाठी इचलकरंजी नगरपालिकेकडून मोफत उपचार व्हावेत म्हणून सतत प्रयत्न मा. क.प. ने केले आहेत. कामगाराला सतत काम करावे लागत असल्याने त्याला सकस आहाराबाबत मार्गदर्शन, अनुभवी डॉक्टरांची शिबीरे आयोजित करून त्याना आरोग्याविशयी माहिती दिली जाते."[7]

## 6) शैक्षणिक कार्य :-

"कोणताही राजकीय पक्ष शिक्षणसंस्था चालवित नाहीत. शैक्षणिक कार्य करत नाही. पण मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने शैक्षणिक उपक्रम राबविण्याचा प्रयत्न केला होता. पक्षामार्फत आसरा नगर व भोणे मळा येथे अंगणवाडी व दोन बालवाड्या सुरू केल्या होत्या. पण नगरपालिकेने अशा प्रकारे बालवाड्या व अंगणवाड्या सुरू कराव्यात यासाठी सतत प्रयत्न केले आणि इचलकरंजी नगरपालिकेने याची दखल घेवून बालवाड्या व अंगणवाड्या सर्वत्र सुरू केल्या.

नगरपालिकेने सुरू केलेल्या बालवाड्या, अंगणवाड्या मधील बालकांना सकस आहार मिळावा. त्याना गणवेश व खाऊ मिळावा. त्याच्यात शिक्षणाची आवड निर्माण व्हावी. यासाठी पक्षांमार्फत प्रयत्न केले आहेत."[8]

## 7) सामाजिक प्रबोधन :-

"समाजात अनेक अनिष्ट चालीरिती आहेत. अंधश्रद्धा, बालविवाह, अस्पृश्यता, हुंडाबळी अशा निरनिराळ्या विषयावर लोकांच्यात प्रबोधन करणे गरजेचे आहे. सामाजिक ऐक्य व एकात्मता निर्माण व्हावी. जातीय द्वेष नष्ट व्हावा. आणि जातीय सलोखा राहावा म्हणून सामाजिक प्रबोधन करणे आवश्यक आहे.

समाजात भ्रष्टाचार बोकाळला आहे. स्थानिक पातळी पासून ते वरपर्यंत भ्रष्टाचार होत आहे. बडे अधिकारी, मंत्री याचे हात यामध्ये असतात. त्यामुळे भ्रष्टाचार हा शिष्टाचार झाला आहे.

यासाठी मार्क्सवादी पक्षाने स्थानिक पातळीपासून देशपातळीपर्यंत जनजागृती मोहिम आखली. स्थानिक पातळीवर भ्रष्टाचार उघडकीस आला तर प्रांत कार्यालयावर, गाव चावडी, तहसिल कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चे काढले आहेत आणि संबंधित अधिकाऱ्याना निलंबती करून चौकशी करा. अशी मागणी केली जाते."[9]

अशा पद्धतीने सामाजिक प्रबोधन व जनजागृती मोहीम राबविली जाते. सर्वसामान्य लोकांना आरोग्य सेवा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या प्रयत्नामुळे उपलब्ध झाल्या आहेत.

## महिलाविषयक कार्य :-

"मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने स्त्रियांना समान दर्जा मिळावा यासाठी अनेकवेळा जन आंदोलने उभी करण्याचा प्रयत्न केला. महिलांना समाजात मिळणारी वागणूक, सामाजिक दर्जा, प्रतिष्ठा

प्राप्त करून देणे हे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे मुख्य ध्येय आहे. महिलांच्यावर होणारा अन्याय, अत्याचार, बलात्कार या अन्यायाविरुद्ध वेळोवेळी मा. क. प ने लढा उभा केला. समाजात असणाऱ्या विकृती नष्ट करून महिलांचे रक्षण करण्याचा प्रयत्न केला.

इचलकरंजीतील यंत्रमागावरील काम करणाऱ्या महिलांना योग्य सवलती द्याव्यात. त्यांना रात्रपाळी देवू नये. त्यांच्यात असणारे अज्ञान दूर व्हावे. यासाठी मा. क. प ची जनवादी महिला संघटना स्थापन करून केली. त्यांना संघटित करून जागृती घडवून आणण्याचा प्रयत्न केला."[10]

अशा तऱ्हेने महिलांच्या अन्यायाविरुद्ध, अत्याचाराविरुद्ध तसेच सामाजिक शोषणाविरूद्ध जाणीव निर्माण करण्याचे कार्य मा. क. प करीत आहे.

<u>जनजागृती</u> :-

"इचलकरंजीमध्ये सर्वसामान्य लोकांबरोबर कामगारामध्ये जनजागृती करण्याचे कार्य मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने केले आहे. त्याचबरोबर समाजातील विभिन्न गटांचे प्रबोधन व जनजागरण करण्याचा प्रयत्न केला. सर्वसामान्य लोकांचा सामाजिक दर्जा सुधारावा. त्यांना सामाजिक प्रतिष्ठा मिळावी यासाठी प्रयत्न मा. क. प. ने केले.

खर्चिवाल्या यंत्रमाग मालक व सुत दलालांचा प्रश्न पेढीवाला मालक यांच्या समस्या दूर करण्यासाठी मा. क. प. ने प्रयत्न केले आहे. म्हणून मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष फक्त कामगारांचे प्रश्नासाठी संघर्ष करत नाही तर इचलकरंजीतील कापड व्यवसाय टिकावा यासाठी सातत्याने प्रयत्न करत

आहे."[11]

इचलकरंजीतील यंत्रमागधारक मालक व कामगार यांना सरकारने संरक्षण द्यावे. या धंद्याला बाजारपेठ निर्माण करून द्यावी. तयार झालेले कापड सरकारने घ्यावे. कामगारांना किमान कायदेशीर हक्क द्यावेत यासाठी संघर्ष करून या व्यवसायासंबंधी जनजागृती निर्माण केली आहे.

## बेकारी व बेरोजगारी :-

"इचलकरंजीतील सुशिक्षित बेकाराची संख्या वाढत आहे. त्यासाठी पक्षाच्या डी.वाय. एफ. आय. या संघटनेद्वारे बेरोजगारीचा प्रश्न सुटावा म्हणून कार्य सुरू आहे.

इचलकरंजीत यंत्रमाग व्यवसायात आर्थिक मंदीमुळे कामगार बेकार होऊ लागले. छोट्या यंत्रमागधारकांनी व्यवसायातील सततच्या होणाऱ्या तोट्यामुळे आपले यंत्रमाग विकले. त्यामुळे बेकारीत वाढ झाली आहे.

बेरोजगाराना सुशिक्षित बेकार भत्ता द्यावा यासाठी संघर्ष, आंदोलने पक्षाने केली आहेत. अशा प्रकारे ही समस्या काही अंशी सोडविण्याचा प्रयत्न मा. क. प ने केला आहेत.

## कामगाराचे राहणीमान :-

यंत्रमाग व्यवसायात गुतलेल्या कामगारांचे राहणीमान निकृष्टप्रतीचे आहे. विविध व्यवसायातील कामगाराच्या राहणीमानाचा दर्जा सुधारावा यासाठी प्रयत्न केले आहेत. कामगाराला योग्य वेतन दिले तरच लोकांचा राहणीमानाचा दर्जा उंचावेल. कामगारांना किमान सेवा सवलती व घर, टी.व्ही.,

रेडीओ या सुविधा सरकारने उपलब्ध करून दिले पाहिजेत.

अशा प्रकारे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने इचलकरंजीमध्ये सामाजिक क्षेत्रात कार्य केले आहे. इचलकरंजी लोकांच्या सामाजिक समस्या दूर व्हाव्यात यासाठी कम्युनिस्ट पक्षाने प्रयत्न केले आहे.

**घरफाळा :-**

इचलकरंजी नगरपालिकेने घरफाळा वाढ केली. सर्व सामान्य लोकांना घरफाळा महागाईमुळे भरणे अशक्य आहे म्हणून मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने घरफाळा विरोधी आंदोलन केले. आणि घरफाळा वाढ स्थगित करण्यास भाग पाडले."[12]

## 2. "भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सामाजिक क्षेत्रातील कार्य. "

समाजातील विभिन्न समान गटाचा पाठिंबा मिळविण्यासाठी प्रत्येक राजकीय पक्षांना विविध कार्ये करावी लागतात. त्यामध्ये सामाजिक स्वरूपाची कार्ये पार पाडावी लागतात. इचलकरंजीमध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्षाने पुढील सामाजिक कार्ये केलेली आहेत.

### 1. यंत्रमाग कामगारांचे प्रश्न :-

"इचलकरंजीमध्ये यंत्रमाग कामगार असंघटित आहेत. असंघटित कामगारांची पिळवणूक कारखानदारांकडून मोठ्या प्रमाणात होते. त्याची आर्थिक पिळवणूक होते. अशा पिळवणूक झालेल्या लोकांचे संघटन करून त्याचे प्रश्न भारतीय कम्युनिस्ट पक्षाने करवीर कामगार संघामार्फत सोडविण्याचे प्रयत्न केले आहेत.

रेडीओ या सुविधा सरकारने उपलब्ध करून दिले पाहिजेत.

अशा प्रकारे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने इचलकरंजीमध्ये सामाजिक क्षेत्रात कार्य केले आहे. इचलकरंजी लोकांच्या सामाजिक समस्या दूर व्हाव्यात यासाठी कम्युनिस्ट पक्षाने प्रयत्न केले आहे.

**घरफाळा :-**

इचलकरंजी नगरपालिकेने घरफाळा वाढ केली. सर्व सामान्य लोकांना घरफाळा महागाईमुळे भरणे अशक्य आहे म्हणून मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने घरफाळा विरोधी आंदोलन केले. आणि घरफाळा वाढ स्थगित करण्यास भाग पाडले."[12]

## 2. "भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सामाजिक क्षेत्रातील कार्य. "

समाजातील विभिन्न समान गटाचा पाठिंबा मिळविण्यासाठी प्रत्येक राजकीय पक्षांना विविध कार्ये करावी लागतात. त्यामध्ये सामाजिक स्वरूपाची कार्ये पार पाडावी लागतात. इचलकरंजीमध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्षाने पुढील सामाजिक कार्ये केलेली आहेत.

### 1. यंत्रमाग कामगारांचे प्रश्न :-

"इचलकरंजीमध्ये यंत्रमाग कामगार असंघटित आहेत. असंघटित कामगारांची पिळवणूक कारखानदारांकडून मोठ्या प्रमाणात होते. त्याची आर्थिक पिळवणूक होते. अशा पिळवणूक झालेल्या लोकांचे संघटन करून त्याचे प्रश्न भारतीय कम्युनिस्ट पक्षाने करवीर कामगार संघामार्फत सोडविण्याचे प्रयत्न केले आहे.

झोपडपट्ट्याचे निमूर्लन नगरपालिकेने सुरू केले आहे. झोपडपट्टीधारकाचे चांगल्या जागेत पूनर्वसन व्हावे. ती जागा त्याच्या मालकीची व्हावी. स्थलांतरीत जागेत पाणी, लाईट, रस्ते, या सर्व नागरी सुविधा प्राप्त करून द्याव्यात यासाठी भारतीय कम्युनिस्ट पक्षाने वेळोवेळी आंदोलने केली आहे. आणि झोपडपट्टीचा प्रश्न पूनर्वसनाच्या मार्गाने सुटण्यास मदत झाली आहे.

**4. महागाईबाबत पक्षाचे कार्य :-**

महागाईमुळे सर्वसामान्य व्यक्तीला, कामगारांना जीवन जगणे अशक्य झाले आहे. वाढत्या महागाईमुळे कामगारांना अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजांबरोबर जीवनावश्यक वस्तू खरेदी करता येत नाही.

महागाई विरोधी इचलकरंजीमध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्षाने तहसिल कार्यालयावर मोर्चा नेऊन उग्र निदर्शने केली. "आजपर्यंतच्या राजकर्त्यांनी विकासाचा जो मार्ग स्विकारला त्याचा फायदा प्रचंड बहुसंख्येने असलेल्या कष्टकरी जनतेला मिळाला नाही. परिणामी विषमता वाढली. एका बाजूला अन्नधान्य उत्पादन वाढले. 1950 साली ते उत्पादन 5 कोटी टन होते, तर 1998 साली 19 कोटी 50 लक्ष झाले. तर दुसऱ्या बाजूला 40% दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत आहेत.

इचलकरंजीमध्ये 2530 इतके लोक दारिद्र्यरेषेखाली आहेत. पण 7 लोकांना याचा फायदा होणार आहे. म्हणून द्रारिद्र्य रेषेखालील लोकांची फेरयादी करावी. द्रारिद्र्यरेषेखालचे निकष केंद्राप्रमाणे असावेत. भारतीय कम्युनिस्ट पक्षाने प्रांत कार्यालयावर मोर्चा काढून सुधारित यादी करण्यास भाग पाडले."[15]

## 5. शहराच्या आरोग्याचा प्रश्न :-

"शहरातील लोकांचे आरोग्य चांगले असले पाहिजे. इचलकरंजी शहरात सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता असली पाहिजे. शहरातील लोकांना स्वच्छ व शुद्ध पाणी पिण्यास मिळाले पाहिजे. शेतीच्या व पिण्याचा पाण्याचा प्रश्न तीव्र बनला आहे. पंचगंगा साखर कारखान्याचे मळीयुक्त पाणी पंचगंगेत सोडले जाते. त्यामुळे ते पाणी पिण्यास व आरोग्यास अपायकारक आहे. भारतीय कम्युनिस्ट पक्ष व परिसर विकास संघ या दोहोंच्या सहकार्याने गेली वर्षभर आंदोलन सुरु आहे.

मा. जिल्हाधिकारी यांनी इचलकरंजीच्या पाणी प्रश्नात लक्ष घालावे म्हणून 5000 लोकांच्या सह्यांचे निवेदन दिले आहे. महाराष्ट्र सरकार फक्त शुद्ध व पिण्यालायक पाणी पुरविण्याची घोषणा करते. पण प्रत्यक्षात याची अमंलबजावणी होत नाही."[16]

## महिला विषयक कार्य :-

"भारतीय कम्युनिस्ट पक्षाने महिलांना प्रत्येक क्षेत्रात संधी मिळावी. यासाठी सतत प्रयत्न केले आहेत. महिलांना सरकारी नोकरीत आरक्षण असावे. महिलांना 33% जागा असाव्यात या महिला विधेयकाचे समर्थन केले आहे.

महिलांच्यावर अन्याय, अत्याचार, महिलांची सामाजिक पिळवणूक होत असेल तर त्याना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न मा. क. प. ने केला. एखाद्या व्यक्तीने बलात्कार केल्यास त्याला कठोर शासन व्हावे. त्या व्यक्तीला कोणीही न्यायालयात जामिन देवू नये. अशी पक्षाची भूमिका आहे.

स्त्री-पुरूष समानतेचा पुरस्कार पक्षाने केला. स्त्री शिक्षणाला प्राधान्य सरकाने द्यावे. स्त्रीयांना सत्तेमध्ये सहभागी करून घ्यावे. भारतीय कम्युनिस्ट पक्षाने केंद्रीय व राज्य स्तरावरील कमिट्यामध्ये 50% महिलांना जागा दिल्या आहेत. भा. क. प. ने कोल्हापूर जिल्ह्याचे सेक्रेटरीपद महिलेला दिले होते. शिराळ तालुक्यात सुशिला पूजारी या महिलेला 3 वर्षे सेक्रेटरी पद दिले होते."[17]

भारतीय कम्युनिस्ट पक्षांचे स्त्रीयांच्या बाबत उदार धोरण आहे. त्यांच्यावर अन्याय, अत्याचार, सामाजिक जुलुम, शोषण जबरदस्ती होवू नये. यासाठी पक्षाने वेळोवेळी संघर्ष केला आहे. आंदोलने केली आहेत. त्याचे प्रश्न व समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला आहे.

## <u>जनजागृती</u> :-

"जनतेचे प्रश्न हाती घेवून त्या प्रश्नाबाबत लोकांच्यामध्ये जनजागृती घडवून आणण्योच कार्य भा. क. प. ने केले आहे. शासनाच्या सुधारित आदेशानुसार दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाचा फेर सर्व्हे करावा या मागणीसाठी नगरपालिकेवर मोर्चा काढून सर्वसामान्य लोकांच्या बाबत शासनाचा दृष्टिकोण कसा आहे हे पटवून देण्याचा प्रयत्न केला.

अशा प्रकारे रेशन दुकानातील भ्रष्टाचार, विभक्त रेशन कार्ड मिळावे. याबाबत जनतेत जागृती घडवून आणण्याचा प्रयत्न केला."[19]

## <u>बेकारी व बेरोजगारी</u> :-

"इचलकरंजीमध्ये यंत्रमाग व्यवसाय बंद पडतो कि काय अशा स्थितीत आहे. त्यामुळे

या व्यवसायात काम करणारे कामगार आहेत त्यांच्यावर बेकारीची कुऱ्हाड कोसळणार आहे. सतत असणारी मंदी, कारखान्याचे स्थलांतर, ग्रामीण भागातील कामगाराची स्वत:च्या गावी व्यवसाय पकडण्याची धडपड. यामुळे इचलकरंजीत कामगारांना बेकारीला तोंड द्यावे लागणार आहे.

या व्यवसायाला शासनाने सवलती द्याव्यात. यंत्रमाग व्यवसाय टिकावा म्हणून भारतीय कम्युनिस्ट पक्ष सतत प्रयत्नशील आहे.

महाविद्यालयातून शिक्षण घेवून बाहेर पडलेल्या तरूणांना नोकरी द्यावी. त्याना रोजगार उपलब्ध करून द्यावा. रोजगार उपलब्ध न झाल्यास त्यांना बेरोजगार भत्ता द्यावा. म्हणून कम्युनिस्ट पक्षाने आंदोलने, मोर्चे काढले आहेत."[20]

## कामगाराचे राहणीमान :-

"कामगारांच्या राहणीमानाचा दर्जा सुधारावा म्हणून भा. क. प. ने प्रयत्न केले आहेत. कामगारांचे राहणीमान सुधारावयाचे असेल तर कामगारांना भरपूर वेतन दिले पाहिजे. अन्यथा त्याचे राहणीमान सुधारता येणार नाही. यंत्रमाग कामगाराला महागाईच्या प्रमाणात मजूरी मिळण्यासाठी अनेक वेळा इचलकरंजीत पक्षाच्यावतीने बंद पाळले आहेत."[21]

## घरफाळा :-

"महाराष्ट्र शासनाने 16 मे 1996 च्या राजपत्रान्वये महाराष्ट्र नगरपालिका कायद्यात दुरूस्ती करून घरफाळाला आकारणीचे पूर्वीचे नगरपालिकांना असलेले अधिकार काढून स्वत:कडे घेतले

आहेत. नगरपालिका हद्दीतील सर्व रहीवाशांचा घरफाळा शासनाच्या मुल्यांकन पद्धतीमुळे चौपट ते दसपट होणार आहे. ही घरफाळा वाढ म्हणजे सर्वसामान्य नागरिकांना आर्थिक बोजा सहन करावा लागणार आहे.

या पद्धतीमुळे जागेच्या किंमतीच्या 6% व इमारतीच्या किंमतीच्या 8% इतकी येणारी रक्कम हे वार्षिक कर योग्य मूल्य मानले जाणार आहे. जागा वडीलोपार्जित वा 20-25 वर्षापूर्वी घेतलेली असली तरीही बांधकाम ज्यावर्षी होईल. त्या वर्षीची जागेची बाजारभावाने किंमत धरली जाईल. त्यामुळे अनावश्यक व अन्याय कर आकारणी होणार आहे."

या अन्याय व जाचक संभाव्य करवाढी विरोधात जागृत होऊन लढा उभा करण्याचे काम भारतीय कम्युनिस्ट पक्षाने केले आहे."[21]

**<u>शैक्षणिक कार्य</u> :-**

"भारतीय कम्युनिस्ट पक्षाने तळागाळातील जनतेच्या लहान मुलांच्यासाठी गेल्या 10 वर्षापासून बालवाडी सुरू केली आहे. सध्या ती बालवाडी कार्यरत आहे. याचबरोबर पक्षाने इचलकरंजी नगरपालिका बालवाड्यातील मुलांना खाऊ, सकस आहार मिळावा म्हणून प्रयत्न केला आहे.

शैक्षणिक क्षेत्रातील ज्या अपप्रवृत्ती आहेत त्या नष्ट करण्याचा प्रयत्न भा. क. प.ने केला आहे. महाविद्यालयीन प्रवेशाच्या संदर्भात वेळोवेळी समस्या निर्माण होतील तेव्हा आंदोलन केले आहे. आणि मुलांना प्रवेश मिळवून दिला आहे."[22]

अश प्रकारे भारतीय कम्युनिस्ट पक्षाने शैक्षणिक क्षेत्रात कार्य केले आहे.

## "मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची राजकीय कार्ये"

"राजकीय पक्ष हा एक सामाजिक गट असतो. तो सत्ता प्राप्त करण्यासाठी सदैव जागृत असावा लागतो. लोकमताचे प्रकटीकरण पक्षाद्वारे होत असते. लोकशाही शासन पद्धतीमुळे राजकीय पक्षाना महत्त्व प्राप्त होते. प्रचार व चळवळीद्वारा सत्ता स्थापन करण्यासाठी स्वयंप्रेरणेने एकत्र आलेला व्यक्तीचा समूह म्हणजे राजकीय पक्ष होय."[23]

इचलकरंजीमध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची स्थापना 1964 साली झाली. 1964 ते 1999 या काळातील कार्याची दिशा पाहणे उचित ठरेल. त्या दृष्टीने पक्षाने पद्धतीने संघटनात्मक बांधणी करून आपल्या कार्याला सुरूवात केली.

### पक्षबांधणीचे कार्य :-

"इचलकरंजीमध्ये कम्युनिस्ट पक्षाचे बांधणी, संघटना निर्माण व्हावी. याकामी कॉ. एस् . पी. पाटील, कॉ. के. एल् . मलाबादे यांनी प्रयत्न केले. कामगार कष्टकरी जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी आणि मार्क्सवादी- लेनिनवादी विचार समाजात प्रत्यक्षात आणण्यासाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची स्थापना केली.

सुरूवातीला यंत्रमाग धंद्यातील यंत्रमाग कामगाराना संघटित करून त्यांच्यात वर्गीय भावना जागृत केली. या कामगार चळवळीतून मार्क्सवादी तत्वज्ञानावर निष्ठा असलेला पक्ष सदस्य

निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

पक्षाच्या कार्याचा विस्तार वाढविण्यासाठी जन आंदोलने उभारणे, पक्षाची भूमिका जनतेपर्यंत पोहोचविणे, पक्ष सभासदांना राजकीय शिक्षण देणे, पक्षाची स्वतंत्र ताकद वाढविणे, असे प्रयत्न मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षामार्फत इचलकरंजीत केले गेले."[24]

**<u>दडपशाहीचे पर्व</u> :-**

इचलकरंजीमध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची स्थापना झाल्यानंतर महाराष्ट्रात व देशभर सरकारने डाव्या कम्युनिस्टांना चीनवादी घोषित करून पक्षातील नेत्यांना तरूंगात डांबण्याचा सपाटा लावला. याचा परिणाम म्हणजे इचलकरंजीतील पक्षाचे काम काही काळ स्थगित करावे लागले. दडपशाहीचे धोरण स्थगित झाल्यानंतर पक्ष नेतृत्त्वाचे पक्ष बांधणीस सुरूवात केली.

कोणत्याही राजकीय पक्षाचे मुल्यमापन निवडणूकीच्या यशावर असते. म्हणून मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या इचलकरंजी शाखेने नगरपालिका निवडणूकापासून ते लोकसभेच्या निवडणूकांसाठी उमेदवार उभे केले."[25]

**<u>नगरपालिका निवडणूक</u> :-**

"स्थानिक राजकारणात पक्षाचे विचार लोकांपर्यंत पोहोचावेत आणि लोकांची कामे, लोक जागृती करता यावी म्हणून मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने इचलकरंजी नगरपालिका निवडणूका लढविल्या.

| साल | एकूण जागा | लढविलेल्या जागा | विजयी उमेद्वार |
|---|---|---|---|
| 1962 | 45 | सर्व | - |
| 1967 | 45 | 12 | 03 |
| 1974 | 48 | सर्व | - |
| 1979 | 49 | 21 | - |
| 1985 | 52 | 15 | 06 |
| 1990 | 52 | 07 | 02 |
| 1995 | 52 | 09 | 01 |

अशा पद्धतीने इचलकरंजी नगरपालिकेच्या निवडणूका मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने लढवून इचलकरंजीत पक्ष विस्तारास सुरूवात केली आहे. 1962, 1974 मध्ये डाव्या पक्षांची आघाडी करून सर्व जागा लढविल्या. पण कोणताही उमेद्वार विजयी झाले नाहीत. दोन्ही निवडणूकीत आघाडीच्या उमेद्वारांची मताची टक्केवारी चांगली होती. त्यामुळे मातब्बर उमेद्वारांना पराभव पत्करावा लागला.

1985 च्या नगरपालिका निवडणूकीत पक्षाला सहा जागा मिळाल्या. त्यावेळी कॉ. के. एल. मलाबादे नगराध्यक्ष झाले. नगराध्यक्ष कारकिर्दीत अनेक लोकहिताचे निर्णय घेतले. शहरातील

पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, शहरात प्रत्येक प्रभाग कुपनलिका मारल्या गेल्या, संडास व मुताऱ्या सर्वत्र बांधल्या गेल्या. रस्ते व नागरी सुविधा निर्माण करून दिल्या गेल्या."[26]

**<u>विधानसभा निवडणूक</u> :-**

"मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने 1964 पासून विधान सभा निवडणूका लढविण्यास सुरूवात केली. 1978 साली मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे कॉ. एस् . पी. पाटील विधानसभेवर निवडून आले. आणि 1990 साली कॉ. के. एल. मलाबादे निवडून आले.

या दोन्ही निवडणूकीत पक्षांचे उमेदवार निवडून आले. म्हणजे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष लोकांच्यापर्यंत जावून पोहचते आहे. त्या कार्याची पोच पावती आहे. भांडवलदार लोकांचा पाठिंबा पक्षाला नाही. गरीब व सर्वसामान्य लोकांचा पाठिंबा पक्षाला आहे. काही सहानुभूतीदार मतदार पक्षाला मतदान करतात.

कॉ. के. एल. मलाबादे हे आमदार झाल्यानंतर इचलकरंजी व जवळच्या परिसरातील विकासाची कामे मोठ्या प्रमाणात केली. या काळात पक्षाने इचलकरंजीबाहेर पक्षाचा विस्तार वाढविला. शेतकरी, शेतमजूर व कष्टकरी जनता याचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. ग्रामीण भागात शुद्ध पाणी पीण्यास मिळावे म्हणून नळपाणी योजना सुरू केल्या. ग्रामीण भागात वाचनालये, हरिजन मंदीर, ही कामे केली. इचलकरंजी विधानसभा जागा लढविल्या."[27]

1967 पासून मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने निवडणूका लढविल्या. 1978 व 1980

च्या विधानसभा निवडणूकीत अनुक्रमे कॉ. एस् .पी. पाटील व कॉ. के. एल. मलाबादे विजयी झाले.

1967, 1972, 1980, 1985, 1990 मध्ये झालेल्या विधानसभा निवडणूकीत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या उमेद्वाराना निवडणूकीत पराभव पत्करावा लागला. या निवडणूकीत काँग्रेसचे उमेद्वारांना विजय मिळाला. काही वेळा काँग्रेसच्या अंतर्गत दूहीचा फायदा मा. क. प. च्या उमेदवाराना मिळतो.

अशा रितीने मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने इचलकरंजी विधानसभा निवडणूका लढविल्या.

<u>लोकसभा निवडणूक</u> :-

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने इचलकरंजीत लोकसभेची निवडणूक लढविण्याचा प्रयत्न केला. 1976 पासून लोकसभा निवडणूक मा. क. प. ने लढविल्या. 1996 साली मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे कॉ. के. एल. मलाबादे यांनी निवडणूक लढविली. त्याना त्या निवडणूकीत 88, 329 मते मिळाली व 1998 च्या निवडणूकीत कॉ. माया पंडित यांना 24147मते मिळाली. या दोन्ही निवडणूकीत काँग्रेसचे उमेदवार श्री. कल्लाप्पाण्णा आवाडे विजयी झाले.

## 1996 च्या लोकसभा निवडणूकीत उमेदवारांना मिळालेली मते

| अ. नं. | उमेदवारांचे नाव | पक्ष | मिळालेली मते | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| 1. | आवाडे कल्लाप्पा बाबुराव | काँग्रेस | 237510 | 34.44 |
| 2. | अकिवाटे विद्यासागर देवाप्पा | अपक्ष | 8756 | 1.27 |
| 3. | खत्री सी. जे. | अपक्ष | 1872 | 0.27 |
| 4. | सरनोबत गणपतराव आनंदराव | भाजप | 125667 | 18.22 |
| 5. | गायकवाड रंगराव लक्ष्मण | अपक्ष | 2133 | 0.31 |
| 6. | देसाई रामराव तुकाराम | जद | 5166 | 0.75 |
| 7. | डॉ. धोतरे तातोबा निवृत्ती | अपक्ष | 1247 | 0.18 |
| 8. | माने निवेदिता संभाजी | अपक्ष | 2,20,900 | 30.30 |
| 9. | पाटील आण्णासाहेब बाबगोंडा | अपक्ष | 3368 | 0.49 |
| 10. | मलाबादे कल्लाप्पा एल. | सी. पी. एम. | 88329 | 12.89 |
| 11. | मुदगल नामदेव तातोबा | अपक्ष | 2482 | 0.36 |
| 12. | मुसळे भूपाल नायकू | अपक्ष | 3276 | 0.47 |
| 13. | डॉ. पूणतांबेकर शिरीष रामकृष्ण | अपक्ष | 917 | 0.13 |

## 1998 च्या लोकसभा निवडणूकीत उमेदवारांना प्राप्त झालेली मते

| अ. नं. | उमेदवारांचे नाव | पक्ष | मिळालेली मते | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| 1. | आवाडे कल्लाप्पा बाबुराव | कॉंग्रेस | 344817 | 48.02 |
| 2. | माने निवेदिता संभाजी | शिवसेना | 332623 | 46.32 |
| 3. | प्रा. माया उदय नारकर (पंडित) | सी. पी. एम्. | 24147 | 3.36 |
| 4. | अकिवाटे विद्यासागर देवाप्पा | अपक्ष | 6662 | 0.93 |
| 5. | बंडगर आप्पा आण्णाप्पा | अपक्ष | 4272 | 0.59 |
| 6. | प्रा. प्रज्ञवित गौतम | बी. एस. पी. | 23.8 | 0.32 |
| 7. | डॉ. पूणतांबेकर शिरीष रामकृष्ण | अपक्ष | 1574 | 0.22 |
| 8. | कोरे सुभाष दिनकर | अपक्ष | 1105 | 0.15 |
| 9. | गायकवाड रंगराव लक्ष्मण | अपक्ष | 559 | 0.08 |

अशा प्रकारे मा. क. प. ने 1996 व 1998 च्या लोकसभा लढविल्या. 1996 च्या निवडणूकीत श्री. मलाबादे के. एल. यांना 12.89% मते मिळाली. तर 1998 च्या लोकसभा निवडणूकीत प्रा. माया पंडित यांना 3.36% मते मिळाली.

1971 व 1991 पर्यंतच्या लोकसभा निवडणूकीसाठी डाव्या आघाडीला किंवा मित्र पक्षांना पाठिंबा मा. क. प. दिला होता.

## सीमा प्रश्नाबाबत पक्षाचे कार्य :-

सिमा प्रश्न सुटावा अशी भूमिका मा. क.प. ची आहे. मराठी भाषिक खेडी महाराष्ट्राला जोडावीत व कन्नड भाषिक खेडी कर्नाटकला जोडावीत. पण कर्नाटक महाजन आयोगाचा आग्रह धरते. मा. क. प. मात्र पाटसकर अहवालनुसार सिमा प्रश्न सोडविण्यास अनकुल आहे.

सिमा प्रश्नाबाबत महाराष्ट्रातील कॉंग्रेसची भुमिका व कर्नाटकमधील कॉंग्रेसची भुमिका यात फरक आहे. पण कर्नाटक व महाराष्ट्रात मा. क. प. ची भुमिका एकच आहे. ती म्हणजे पाटसकर अहवालानुसार सिमा प्रश्न सुटावा.

## कष्टकरी कामकरी वर्गाबाबत पक्षाचे कार्य :-

कामगार वर्गाला वर्गीय जाणीव करून देणे, त्याना किमान वेतन मिळावे, त्याचा आरोग्य व राहणीमान सुधारावा याबाबत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने कार्य केले आहे. यंत्रमाग कामगार इतर सेवा सवलती मिळाव्यात. पेन्शन योजना लागू व्हावी. भविष्य निर्वाह निधी योजना सुरू व्हावी. यासाठी पक्षाने अनेक वेळा आंदोलने केली आहेत. कामगार वर्गात जागृती निर्माण करून समाजवादी सत्ता स्थापित करणे. कामगारांचे राज्य निर्माण झालेनंतर कोणाचाही पिळवणूक होणार नाही. याची जाणीव करून देणे आणि क्रांतीस प्रवृत्त करणे.

**"भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राजकीय कार्य":-**

भारतीय कम्युनिस्ट पक्षाने इचलकरंजीच्या राजकीय क्षेत्रात अनेक कार्ये केली आहे. भारतीय कम्युनिस्ट पक्षाची शाखा इचलकरंजीमध्ये जेव्हा निर्माण झाली. तेव्हा लोकांच्यामध्ये सहानुभूती होती. आणि ती सहानुभूती आज सुद्धा टिकून आहे. भारतीय कम्युनिस्ट पक्षाने आपल्या कार्यातून हा विश्वास संपादन केला आहे.

**नगरपालिका निवडणूक :-**

"इचलकरंजी नगरपालिका निवडणूका भारतीय कम्युनिस्ट पक्षाने 1964 पासून लढविण्यास सुरूवात केली. भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सदस्य हे गरीब, कष्टकरी वर्गातील असल्याने त्याना निवडणूकीसाठी पैसा खर्च करता येत नाही. त्यामुळे श्रीमंत व भाडंवलदार लोकांचे वर्चस्व दिसून येते. तरीपण पुढील प्रमाणे इचलकरंजीमध्ये नगरपालिका निवडणूका लढविल्या आहेत.

| साल | एकूण जागा | लढविलेल्या जागा | विजयी उमेदवार |
|---|---|---|---|
| 1967 | 45 | लढविल्या नाहीत. | - |
| 1974 | 48 | -"- | |
| 1979 | 48 | -"- | |
| 1985 | 52 | 12 | - |

| | | | |
|---|---|---|---|
| 1990 | 52 | 1 | - |
| 1995 | 52 | 2 | - |

अशा पद्धतीने जरी नगरसेवक निवडून आले नसले तरी उमेदवारांच्या मतांची संख्या व टक्केवारी चांगली आहे. या पक्षाकडे लोकाचा ओढा वाढत आहे. इचलकरंजीतील लोकांची लोकोपयोगी लोकहिताची कामे भारतीय कम्युनिस्ट पक्षामार्फत केली जातात. त्यामुळे पक्षाला सहानुभूती मिळत आहे. भविष्यात या पक्षाचा विस्तार मोठा होणार यात शंका नाही."[29]

## <u>विधानसभा निवडणूक व लोकसभा निवडणूक</u> :-

"भारतीय कम्युनिस्ट पक्षाने विधानसभा लोकसभा निवडणूक अद्याप एकही लढविली नाही. डाव्या विचारावर एकत्र येवून आघाडी केंद्रीय व राज्य स्तरावर केली जाते. तेव्हा भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सदस्य कार्य करताना दिसतात. त्या उमेदवारांना निवडणूकीत मदत करणे त्यांच्या धोरणांना पाठिंबा देणे इ. पक्ष कार्यकर्ते करतात.

## <u>सिमा प्रश्नाबाबत पक्षाचे कार्य</u> :-

कर्नाटक महाराष्ट्र सिमा प्रश्न सुटावा अशी पक्षाची भूमिका आहे. मराठी भाषिक खेडी महाराष्ट्राला जोडावीत व कन्नड भाषिक खेडी कर्नाटकला जोडावीत आणि सिमा प्रश्न निकालात काढावा अशी पक्षाची धारणा आहे.

कर्नाटक बेळगांव आपल्याला हवे आहे असे म्हणत तर महाराष्ट्र बेळगावं महाराष्ट्राला

पाहिजे असे म्हणते. त्यामुळे हा प्रश्न राजकारणात गेला आहे. या प्रश्नाची सोडवणूक तावडतोब होईल असे वाटत नाही.

## कामगार कष्टकरी वर्गाबाबत पक्षाचे कार्य :-

कामगारांना किमान वेतन मिळावे. त्याचे राहणीमान सुधरावे. अन्न वस्त्र व निवारा या मूलभूत गरजा मिळाव्यात यासाठी पक्षाने आंदोलने केली आहेत. कामगाराला प्रा. फंड, पेन्शन, सेवा, सवलती उपलब्ध व्हाव्यात यासाठी प्रयत्न भा. क. प. ने केले आहेत.

शेतकरी व शेतमजूर याच्या प्रश्नाबाबत पक्षाने मोर्चे, आंदोलने केली आहेत. शेतकऱ्याच्या मालाला योग्य भाव द्यावा. शेतमजूरांना किमान वेतन द्यावे यासाठी प्रयत्न केले आहेत."[30]

अशा पद्धतीने भारतीय कम्युनिस्ट पक्षाने राजकीय क्षेत्रात कार्य केले आहे.

इचलकरंजीमध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष व भारतीय कम्युनिस्ट पक्ष यांनी कामगारांच्या विविध प्रश्नांवर काम केले आहे. कामगारांना किमान वेतन मिळावे. त्यांना भविष्य निर्वाह निधी योजना, ग्रॅज्युएटी, फंड, बोनस या सुविधा मिळाव्यात म्हणून कार्य केले आहे. त्याचबरोबर समाजकार्य व सामाजिक प्रबोध केले आहे. सामाजिक क्षेत्रातील कार्य दोन्ही कम्युनिस्ट पक्षाचे प्रभावी आहे.

नगरपालिका निवडणूकीत दोन्ही पक्षांना अपेक्षित यश मिळू शकले नाही. कारण दोन्ही पक्षांत मतविभागणी झाल्याने त्यांना नगरपालिकेत सत्ता निर्माण करता आली नाही. दोन्ही पक्षांनी आघाडी

स्थापून, डाव्या विचारसरणीच्या पक्षांबरोबर समझोता केल्यास नगरपालिका सत्ता स्थापन करता येईल.

विधानसभा निवडणूकीत मा. क.प. चे कॉ. श्री. एस्. पी. पाटील 1978 मध्ये निवडून आले. 1990 मध्ये कॉ. के. एल्. मलाबादे निवडून आले. भारतीय कम्युनिस्ट पक्षाने मात्र विधान सभा निवडूका लढविल्या नाहीत.

लोकसभा निवडणूका 1996, 1998 साली मा. क. प. ने लढविल्या. पण त्यांना अपेक्षित यश मिळाले नाही. इचलकरंजी शहराबाहेर या पक्षांचा विस्तार झाला नाही. पक्षाला प्रभाव निर्माण करावयाचा असेल तर ग्रामीण भागात पक्ष कार्यकर्त्यांचा संच निर्माण करणे आवश्यक आहे.

## : संदर्भ :

1. प्रा. बी. बी. पाटील , फडके प्रकाशन, कोल्हापूर, पा. नं. 195

2. कॉ. मधुकर चिखले , मुलाखत , मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष

3. कॉ. मधुकर चिखले , मुलाखत , मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष

4. का. शिवगोंडा खोत , मुलाखत , मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष

5. कॉ. दत्ता माने , मुलाखत , मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष

6. कॉ. दत्ता माने , मुलाखत , मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष

7. कॉ. दत्ता माने , मुलाखत , मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष

8. कॉ. किरण माळी , मुलाखत , मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष

9. कॉ. भरमा कांबळे , मुलाखत , मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष

10. कॉ. अंबुताई शेळके , मुलाखत , मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष

11. कॉ. दत्ता माने , मुलाखत , मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष

12. कॉ. दत्ता माने , मुलाखत , मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष

13. कॉ. मारूती आजगेकर , मुलाखत , भारतीय कम्युनिस्ट पक्ष

14. कॉ. मारूती आजगेकर , मुलाखत , भारतीय कम्युनिस्ट पक्ष

15. कॉ. हणमत लोहार , मुलाखत , भारतीय कम्युनिस्ट पक्ष

16. कॉ. हणमत लोहार , मुलाखत , भारतीय कम्युनिस्ट पक्ष

17. कॉ. श्रीमती लोखंडे , मुलाखत , भारतीय कम्युनिस्ट पक्ष

18. कॉ. फूलाजी लोखंडे , मुलाखत , भारतीय कम्युनिस्ट पक्ष

19. कॉ. फूलाजी लोखंडे , मुलाखत , भारतीय कम्युनिस्ट पक्ष

20. कॉ. फूलाजी लोखंडे , मुलाखत , भारतीय कम्युनिस्ट पक्ष

21. कॉ. हणमंत लोहार , मुलाखत , भारतीय कम्युनिस्ट पक्ष

22. कॉ. हणमंत लोहार , मुलाखत , भारतीय कम्युनिस्ट पक्ष

23. प्रा. बी. बी. पाटील फडके प्रकाशन, कोल्हापूर.

24. कॉ. दत्ता माने , मुलाखत , मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष

25. कॉ. दत्ता माने , मुलाखत , मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष

26. कॉ. दत्ता माने , मुलाखत , मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष

27. कॉ. हणमंत लोहार , मुलाखत , भारतीय कम्युनिस्ट पक्ष

28. कॉ. हणमंत लोहार , मुलाखत , भारतीय कम्युनिस्ट पक्ष

✱✱✱✱